आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक २६ वा ● रविवार दि. १३ जुलै २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## बिहारमध्ये ८०.११ टक्के मतदारांनी भरले नावनोंदणी फॉर्म

मुंबई, : भारत निवडणूक आयोगाने (ECI) बिहारमधील जवळपास सर्व मतदारांशी थेट संपर्क प्रस्थापित केला असून, आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ६ कोटी ३२ लाख ५९ हजार ४९७ म्हणजेच ८०.११% मतदारांनी नावनोंदणी फॉर्म (Enumeration Forms - EF) भरून सादर केले आहेत. ही लक्षवेधी कामगिरी वेळेआधीच साध्य झाली आहे.

ईसीआयनेट (ECINet) या नव्याने विकसित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये सर्व ४० जुने ॲप्स समाविष्ट करण्यात आले आहेत आणि यामध्ये आतापर्यंत ४.६६ कोटी फॉर्म डिजिटल स्वरूपात अपलोड करण्यात आले आहेत.

राज्यात ७७,८९५ बूथस्तर अधिकारी (इडजी) कार्यरत आहेत आणि त्यांच्यासोबत २०,६०३ नव्याने नियुक्त इडजी कार्यान्वित आहेत. एकूण ३८ जिल्हा निवडणूक अधिकारी (DEOs), २४३ विधानसभा मतदारसंघांतील मतदार नोंदणी अधिकारी (EROs) आणि ९६३ सहाय्यक एठजी या कामावर लक्ष ठेऊन आहेत.

या कार्यात राजकीय पक्षांनीही भाग घेतला असून १.५ लाख बीएलए (BLA) घराघरात जाऊन सर्व मतदारांची माहिती संकलित करत आहेत. ४ लाखाहून अधिक स्वयंसेवक वृद्ध, दिव्यांग व इतर संवेदनशील गटांतील मतदारांना सहाय्य करत आहेत.

२४ जून २०२५ रोजी मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश सुनिश्र्चित करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. याअंतर्गत प्रत्येक मतदाराला २५ जुलै २०२५ पर्यंत एऋ फॉर्म सादर करावा लागेल.

ज्या मतदारांनी अद्याप पात्रता कागदपत्रे सादर केली नाहीत, त्यांनी ही कागदपत्रे ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत सादर करता येतील. हे कागदपत्र सादर करण्यासाठी स्वयंसेवकांची मदत देखील घेतली जाऊ शकते.

१ ऑगस्ट २०२५ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे सर्व पात्र नागरिकांना त्यांच्या नावाचा समावेश सुनिश्र्चित करण्यासाठी विहित मुदतीपूर्वी फॉर्म सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे, असे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## मिरगाव येथील भूस्खलन बाधितांना पक्की घरे मिळण्यासाठी डिसेंबरअखेर काम पूर्ण करा -पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : मिरगाव येथील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या बाधित कुटुंबांना पक्की घरे ताब्यात मिळण्यासाठी येत्या डिसेंबर अखेर काम पूर्ण करावे, अशा सूचना पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी दिल्या.

दौलतनगर ता. पाटण येथील शासकीय विश्रामगृहात मिरगाव ता. पाटण येथील ग्रामस्थांचे भूस्खलनामुळे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात आढावा बैठक पालकमंत्री देसाई यांच्याअध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल अहिरे, पाटणचे तहसीलदार अनंत गुरव, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई आदी उपस्थित होते.

मिरगाव येथील जुलै २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाल्याने १४७ कुटुंबांचे नुकसान झाले आहे. त्यापैकी ४७ कुटुंबे पूर्णतः भूस्खलीत झाली आहेत. ९८ कुटुंबाचे स्थलांतरण निवारा शेडमध्ये तात्पुरता स्वरुपात करण्यात आले आहे. या बाधित कुटुंबांना पक्की घरे देऊन पुनर्वसन करण्याचे काम शासन करीत असल्याचे सांगून पालकमंत्री देसाई म्हणाले, येत्या डिसेंबरअखेर किमान १०० घरांची कामे तात्काळ पूर्ण करून बाधित कुटुंबांना ताबा देऊन पुनर्वसित करावे. तसेच उर्वरित काम येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे. या कामात विलंब लावू नये. बांधकाम पूर्ण करण्याच्या कामात अडवणूक करणाऱ्यां विरोधात पोलिस विभागाचे सहकार्य घेऊन कारवाई करावी, अशा सूचनाही पालकमंत्री देसाई यांनी दिल्या.

# ‘मिसिंग लिंक प्रकल्प’ अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे: यशवंतराव चव्हाण मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावरील ‘मिसिंग लिंक’ प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. या प्रकल्पतील एक बोगदा देशातील सर्वात लांब बोगदा असून या प्रकल्पामुळे पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ अर्धा तासाने कमी होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुंबई -पुणे द्रुतगती महामार्गावरील ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पच्या कामाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार बाळा भेगडे, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सह व्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल, राजेश पाटील मुख्य अभियंता राजेश निघोट, अधीक्षक अभियंता राहुल वसईकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई-पुणे हे अंतर कमी होणार असल्याने प्रवाशांना याचा फायदा होईल. महामार्गावरील घाटाचा भाग यामुळे टाळता येणार असून घाटमार्गामुळे होणारा वाहतूक अडथळा दूर होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या महामार्गावर आरामदायी प्रवास होणार आहे.

या प्रकल्पांतर्गत एकूण तीन बोगदे असून एक बोगदा ९ किलोमीटर लांब व २३ मीटर रुंदचा असून देशातील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे. या अगोदर समृद्धी महामार्गावरील बोगद्याचा विक्रम या बोगद्यामुळे मागे पडेल. प्रकल्पांतर्गत अतिशय उंच पूल बांधण्यात येत असून याची उंची १८५ मीटर आहे. देशामध्ये आतापर्यंत एवढा उंच पूल कुठल्याही ठिकाणी बांधला गेला नाही. हा देखील एक विक्रम होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळच्यावतीने या प्रकल्पाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. या प्रकल्पाचे एकूण ९४ टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत प्रकल्पाचे काम करणारे अभियंते आणि कामगारांचे कौतुक केले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मिसिंग लिंक प्रकल्प हा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बांधण्यात येत असून, हा प्रकल्प गेम चेंजर ठरणार आहे. येथील वातावरण व हवेच्या दाबाची स्थिती पाहता अतिशय कठीण परिस्थितीमध्ये अनेक अभियंते येथे काम करीत आहेत. हा प्रकल्प सुरु झाल्यावर मुंबई-पुणे दरम्यानचा प्रवास अर्ध्या तासाने कमी होणार असून या घाट भागातील वाहतुकीची समस्या पूर्णपणे सुटण्यास आणि अपघात टाळण्यास मदत होणार आहे. महामार्गावरील या प्रकल्पामुळे वेळेसोबतच इंधनाचीही बचत होईल, प्रदूषणही कमी होईल. देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासाला या प्रकल्पामुळे चालना मिळणार असून सर्वसामान्य नागरिकांना व राज्यातल्या जनतेला हा प्रकल्प दिलासादायक ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी व्यवस्थापकीय संचालक श्री. गायकवाड यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली.

## सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

नागपूर, : भारत आज जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रात



अग्रेसर असणारा देश म्हणून पुढे येत आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्रात देशाची वाटचाल स्वावलंबनाकडे सुरू आहे. स्वावलंबन व सामरिक सज्जतेकडे वाटचाल करत असलेल्या देशाच्या प्रवासात ‘एनएडीपी’तून उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी योगदान देत सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री अंगीकारावी, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमीत पदव्युत्तर व्यवस्थापन पदविकेच्या (PGDM²) पहिल्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी मा. राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, म्युनिशन्स इंडिया लिमिटेड संजय हजारी, मुख्य संचालक, राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी डॉ. जे. पी. दास, संचालक (मानव संसाधन), म्युनिशन्स इंडिया लिमिटेड जे. पी. नाईक यांच्यासह संरक्षण क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमीमध्ये व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका (PGDM²) च्या पहिल्या बॅचच्या दीक्षान्त समारंभाला उपस्थित असल्याचा आनंद असल्याचे सांगून राज्यपाल पुढे म्हणाले की, केवळ पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर आपल्या संपूर्ण राष्ट्रासाठी ही एक मैलाचा दगड ठरणारी घटना आहे. देशाच्या संरक्षण क्षेत्रातील परिवर्तनाच्या प्रवासात या अकादमीतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. ही अकादमी भविष्यात भारतातील संरक्षण उत्पादन व्यवस्थापन क्षेत्रातील एक उत्कृष्ट विद्यार्थी केंद्र बनणार असून त्याचा पाया आज घातला गेला असल्याचे राज्यपाल यावेळी म्हणाले.

राज्यपाल पुढे म्हणाले की, संरक्षण साधने विदेशातून आयात करावी लागायची. परदेशावर अवलंबून राहावे लागायचे. आता मात्र संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनासह संशोधन व आधुनिकीकरण पाहायला मिळत आहे.

सध्याचे युद्ध हे मनुष्यापुरते मर्यादित राहणार नसून तंत्रज्ञानावर आधारित राहणार आहे. तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेता आपल्याला उच्च दर्जाचे संरक्षण तंत्रज्ञान गरजेचे आहे. या अकादमीच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान अवगत होणार आहे. संरक्षण क्षेत्र हे आता सर्वांसाठी खुले झाले आहे. त्यामुळे पुढे जाण्याच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असल्याचे असल्याचे राज्यपाल यावेळी म्हणाले.

विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

एनएडीपीतून पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पदविका प्रदान करण्यात आली. या सर्वच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी संरक्षण क्षेत्रातील विविध कंपन्या, संस्थांमध्ये उपलब्ध झाली आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम एनएडीपी मार्फत राबविण्यात येतो.

## किशोरवयीन मुलींना मासिक पाळी समुपदेशन सलग दुसऱ्या महिन्यात समुपदेश उपक्रम ५६३ मुलींचे समुपदेशन

लातूर/प्रतिनिधी : मासिक पाळी दरम्यान आरोग्यपूर्ण व्यवस्थापनासंबंधी मुलींना मूलभूत माहिती व्हावी व भविष्यातील आरोग्याच्या समस्या दूर करण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी (भा.प्र.से) व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून मासिक पाळी समुपदेशन व मार्गदर्शन शिबिर घेण्यात येत असून या महिन्यात एकूण ५६३ मुलींचे समुपदेशन करण्यात आले आहे.



मनपा आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नागरी आयुष्मान आरोग्य केंद्र अंतर्गत विशेष जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. मुलींमध्ये वाढत्या वयात होणारे शारीरिक बदल, मुख्यत्वे वयाच्या १० ते १४ वर्षा दरम्यान शारीरिक तसेच मानसिक बदलांमधील अवस्था व मासिक पाळी विषयी पौगंडावस्थेतील मुलींना समुपदेशन करणे, व भविष्यातील आरोग्याच्या समस्या कमी करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मासिक पाळी म्हणजे काय ? मासिक पाळी दरम्यान काय काळजी घ्यावी ? मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या समस्या कशा हाताळाव्यात ?, यासह मासिक पाळी दरम्यान चांगल्या स्वच्छतेच्या सवयी कोणत्या आहेत आणि त्याचे महत्त्व काय आहे हे मुलींना समजावून सांगणे आणि त्यांच्या मनातील मासिक पाळी विषयीच्या शंकांचे निरसन करणे, हे कार्य याद्वारे केले जात आहे. मासिक पाळी विषयीच्या गैरसमजुती किंवा मासिक पाळी दरम्यान योग्य स्वच्छतेच्या सवयी न पाळल्यामुळे होणारे आरोग्याचे दुष्परिणाम टाळणे आणि सदरील कालावधीमध्ये मुलीचे शारीरिक / मानसिक स्वास्थ्य चांगले राहावे असा या उपक्रमाचा उद्देश आहे. माहे जुलै महिन्यातील समुपदेशन हे ९,१० व ११ जुलै रोजी शहरातील विविध ठिकाणी महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमार्फत हा विशेष उपक्रम राबवण्यात आला आणि यामध्ये एकूण ५६३ मुलींचे समुपदेशन करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदरील उपक्रमामध्ये मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपक्रम राबवला आणि यशस्वी केला.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते माळेगाव येथील क्रीडा संकुलाच्या बहुउद्देशीय हॉलचे भूमिपूजन

बारामती,: माळेगाव येथील तालुका क्रीडा संकुलाच्या बहुउद्देशीय हॉलचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले, क्रीडा संकुल समिती सदस्य बापूराव तावरे आदी उपस्थित होते.

माळेगाव तालुका क्रीडा संकुल ११ एकरमध्ये साकारले असून या बहुउद्देशीय हॉलमध्ये इनडोअर तायक्वांदो, जुडो, कुस्ती, कबड्डी ,कराटे, बॅडमिंटन यासारख्या क्रीडा स्पर्धा या हॉलमध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. हॉलच्या बाजूला आंतरराष्ट्रीय दर्जेच्या १० मीटर, २५ मीटर व ५० मीटर शूटिंग रेंज तसेच अद्ययावत व्यायामशाळा आदी कामे करण्यात येणार आहेत.

## मानव व वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा होणार चपलख वापर- मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर : विदर्भातील नागपूर वन विभाग, पेंच, ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाजवळील गावांमध्ये वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यातअनेक निष्पाप नागरिकांचा बळी जात असल्याने यावर उपाययोजनेसाठी ‘मार्वल’मार्फत एका विशेष सामंजस्य करारावर आज नागपूर येथे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत ‘मार्वल’चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार व व्याघ्र प्रकल्पाचे वरिष्ठ अधिकारी यांनी कराराचे आदानप्रदान केले. कृत्रीम बुद्धीमत्तेचा प्रभावी वापर करुन अपघात, गुन्ह्याचे प्रमाण कमी व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे.



व्याघ्र प्रकल्पाजवळील गावात कॅमेरे व सायरन करणार वाघांची निगराणी

या करारांतर्गत व्याघ्र प्रकल्पाच्या भोवताली असलेल्या गावाच्या सीमेवर एकूण ३ हजार १५० कृत्रीम बुद्धीमत्तेवर आधारित हे कॅमेरे लावण्यात येतील. गावाच्या दाट वस्तीच्या ठिकाणी सायरन उभारुन ते वायरलेसद्वारे या कॅमेऱ्यांशी जोडले जातील. कॅमेरे वाघ, बिबट्यांना स्वतंत्र ओळखतील असे तंत्रज्ञान या कॅमेऱ्यात असणार आहे. वाघ अथवा बिबट्या कॅमेऱ्यात कैद झाल्याबरोबर गावामध्ये या कॅमेऱ्याशी जोडलेले सायरन गावकऱ्यांना सावध करतील.

करारानुसार पेंच व्याघ्र प्रकल्पात ८७५, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ५२५, नवेगाव व्याघ्र प्रकल्पात ६०० तर नागपूर वनक्षेत्रात १ हजार १४५ हे कॅमेरे व सायरन जोडले जातील. नागपूर विभागात वरचेवर वाढणारे वाघांचे हल्ले लक्षात घेऊन पालकमंत्री बावनकुळे, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यापूर्वी विविध आढावा बैठकीमध्ये या बाबत गंभीर चिंता व्यक्त केली होती. वाघांचे हल्ले शाश्र्वतरित्या थांबवता यावेत व यात होणारी मनुष्यहानी टाळता यावी, यादृष्टीने कृत्रिम बुद्धीमत्तेचा प्रभावी वापर करु असे त्यांनी सांगितले होते. याबाबत राज्याचे वन मंत्री यांच्या समवेत एक व्यापक बैठक घेऊन या कराराबाबत निर्णय घेण्यात आला होता. संपूर्ण नियोजनानंतर आज या करारावर स्वाक्षऱ्या करुन लवकर हे काम पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी वन विभाग व मार्वल कंपनीला दिले.

यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास राव, मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक डॉ. किशोर मानकर, क्षेत्र संचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ल, आर. जयराम गौडा, उपवन संरक्षकविनीत व्यास, उपसंचालक अक्षय गजभिये, सहाय्यक वनसंरक्षक पुजा लिंबगावकर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कार्यपालिकेला भुषणावह अंजन !

## संपादकीय...

भारतीय राज्य घटनेचे,संविधानासने भारतीय जनतेच्या सोयीसाठी न्यायपालिका, कायदेमंडळ आणी कार्यपालिका अंतर्गत अधिकार व मर्यादा घालून दिलेल्या आहेत. न्यायपालिका ही स्वतंत्र आणी निपक्ष असणे गरजेचे असून तिच्या कामात कार्यकारी यंत्रणेचा हस्तक्षेप नसावा असे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती ती संविधानात नमूद आहे. परंतू आजघडीला कार्यकारी यंत्रणाचा मार्ग बदलतो आहे अशा परिस्थितीत न्यायपालीकेत कार्यकारी यंत्रणेचा अर्थात सरकारचा हस्तक्षेप नसावा असे स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधिश भुषण गवई यानी महाराष्ट्र विधीमंडळातील सदस्याच्या डोळ्यात न्यायीक भूषणावह अंजन घालून किमान काजळ वापरुन तरी स्वच्छ, सुंदर, पारदर्शक न्यायीक कारभार करावा असेच न्यायमूर्ती भुषण गवई यानी तसे मत व्यक्त केले असावे अशीच राजकीय वर्तूळात प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

संसदीय मंडळ असो की, विधीमंडळातील सदस्य असोत ते आपापल्या राजकीय पक्षाचीच सत्ता असावी या हेतून असंवैधानीक कृती, वृतीतून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत असतात बहूमताच्या जोरावर सत्ता मिळविली की चक्क विरोधी पक्षाच्या सदस्यानी मांडलेल्या समस्या, विधेयके, विकासात्मक प्रस्ताव अडगळीत टाकून जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवतात, अशी अनेक प्रकरणे संसदेसह विविध राज्यातील विधीमंडळातील अनुभव न्यायपालीकेच्या गाठीला असल्याने आणी महाराष्ट्र विधीमंडळातील वाद, विवादाची प्रकरणे प्रलंबित असल्याचा इतिहास डोळ्यासमोर असल्यानेच सरन्यायाधिश भुषण गवई यानी न्यायपालीकेत कार्यकारी मंडळाचा, सरकारचा हस्तक्षेप नसावा असे विधान केले असावे त्यात वावगे कांही नसावे अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

भारताची राज्यघटना या विषयावर बोलताना न्या. भुषण गवई यानी भारतीय संविधान हे सर्वोच्च असून युध्द आणी शांतता या दोन्ही काळात देशाला एकसंघ ठेवण्याचे कार्य करते, यावर आपला दृढविश्वास आहे असे त्यानी स्पष्ट केले. भारताने संघराज्य पध्दती स्विकारली पण ती अमेरिकेसारखी नसून संविधानाने कार्यपालीका, न्यायपालीका आणी कायदेमंडळाला अधिकारक्षेप व मर्यादा ठरवून दिल्या असल्याने त्या मर्यादाचे उल्लंघण होता कामा नये असे स्पष्ट करुन या तिन्हीही घटकातील यंत्रणानी, सदस्यानी न्यायीक पालन करणे गरजेचे असून त्याविना भारतीय संविधान, लोकशाही अखंड, मजबूत राहील याची दखल घेणे महत्वाचे वाटते या सरन्यायाधिश भुषण गवई यांच्या विधानातून कळत न कळत आजच्या सत्ताकारण, विरोधीकारणातील बदलावरचेच भाष्य असावे अशी ही कूजबूज प्रसारमाध्यमातून होताना दिसते आहे. विशेष करुन सरन्यायाधिश भुषण गवई यानी न्यायापालिका, कार्यपालिका आणी कायदेमंडळ आणी कर्तव्य व प्रक्रिया यार जास्तीचे विवेचन केल्याने सत्ताधारी, विरोधकाना ते एकप्रकारचे अंजन, काजळच ठरावे अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

## युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे.

आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे.

हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे.

चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही.

गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्र्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कुक्कुटपालन - पावसाळ्यातील व्यवस्थापन आणि निगा

पावसाळा ऋतु कुक्कुटपालकांसाठी आव्हानात्मक असतो. या पार्श्र्वभूमिवर कुक्कुटपालनाचे पावसाळ्यातील व्यवस्थापन व निगा याबाबत माहिती देणारा लेख



पावसाळ्यात हवेतील दमटपणा वाढलेला असतो. तसेच पक्ष्यांवर ताण येतो आणि पक्षांच्या व्यवस्थापनाच्या कामांचाही ताण वाढलेला असतो. कुक्कुट खाद्यातील आर्द्रतेचे प्रमाण वाढते, त्यामुळे त्याचा दर्जा खालावण्याची शक्यता असते. या सर्व बाबींचा पक्ष्यांच्या रोगप्रतिकार शक्तीवर विपरीत परिणाम होऊन श्र्वास /अन्ननलिकेच्या रोगांचे प्रमाण वाढते किंवा मर्तुक दिसून येते. अंडी उत्पादन घटते. यासाठी नेहमीपेक्षा जास्त दक्षतेने कुक्कुटपालकांनी पक्षांची देखरेख करणे गरजेचे आहे.

= अशी घ्या काळजी

पावसाळा सुरू होण्यापूर्वी पक्षी घरांची डागडुजी करणे आवश्यक आहे.

पक्षीगृहाच्या शेडची दुरूस्ती करणे, पावसाचे पाणी व्यवस्थित वाहून जाईल याची खात्री करणे, छतास छिद्र असतील तर ती बुजवणे.

पक्षीगृहाच्या दारांची आवश्यक असल्यास दुरूस्ती करून घेणे, पक्षीगृहाच्या आसपास पावसाचे पाणी न साचता वाहून जावे यासाठी ड्रेन तयार करावीत.असल्यास त्यांची दुरूस्ती करून घेणे.

पावसाचे पाणी पक्षी गृहात येऊ नये म्हणून आवश्यक पडद्यांची सोय करावी

गादी पद्धतीने संगोपन करण्यात येत असलेल्या पक्षीगृहातील गाद्यांचे तुस बदलावयाचे असल्यास बदलून घेणे किया त्यास पलटवून घेणे.

गरज असल्यास गादीसाठी अंथरलेल्या तूस अथवा तत्सम पदार्थात योग्य प्रमाणात चुन्याची फक्की मिसळून घ्यावी, जेणेकरून ओलावा कमी राहील.

= कुक्कुटपालकांनी या बाबी प्रामुख्याने करा

न पावसाळ्यात पक्षीगृहातील आर्द्रता वाढून अमोनियाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता असते. यासाठी पक्षीगृह कोरडे ठेवण्याचा प्रयत्न करावा.

न पक्षांचे खाद्य भिजणार नाही याची दक्षता घ्यावी, पक्षी खाद्याची साठवण कोरड्या जागेत करावी.

न पावसाळ्यात जास्त पक्षी खाद्य खरेदी करून साठवण करण्यात येऊ नये.

न पक्षीखाद्य साठवताना जमिनीपासून वर प्लॅटफॉर्मवर ठेवण्याची सुविधा करावी, जेणेकरून जमिनीतील ओलाव्यामुळे पक्षीखाद्यास बुरशी लागणार नाही व त्याचा दर्जा टिकून राहील.

न पक्षांना देण्यात येणाऱ्या पाण्याचा दर्जा योग्य नसल्यास कॉक्सिडीओसिस, इकोलाय, मायकोटॉक्झीन विषबाधा आणि श्र्वसनाचे रोग होण्याची शक्यता असते. त्यामुळे पक्ष्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी द्यावे. तसेच त्यात मेडीक्लोर योग्य प्रमाणात मिसळावे, गरजेनुसार ॲसिडीफायरही वापरावेत.

न पावसाळ्यात तापमानात फरक पडल्यामुळे पक्षी पाणी कमी पितात. तसेच गर्दी करतात. या बदलांमुळे उत्पादन घटण्याची शक्यता असते.

न पावसाळ्यात तापमान कमी असल्यास उर्जेची गरज भागविण्यासाठी पक्षी जास्त खाद्य घेतात. त्यामुळे खाद्यावरील खर्च वाढू शकतो. यासाठी शक्य असल्यास पोषण तज्ज्ञांच्या सल्लयाने खाद्यात आवश्यक बदल करून घ्यावा व पक्षीखाद्य उपलब्धता किफायती ठेवण्याचा प्रयत्न करावा.

न परसातील कुक्कुटपालनाद्वारे मुक्त पद्धतीने संगोपन करण्यात येणाऱ्या पक्षांसाठी अतिरिक्त पशुखाद्य देणे गरजेचे असते. तसेच कोमट पिण्यायोग्य पाणी पिण्यास देणे आवश्यक आहे, जेणेकरून पक्ष्यांच्या शरीरातील ऊर्जा टिकून राहील. न मुक्त वावरणाऱ्या पक्षांचा संपर्क पावसाने साचलेल्या पाण्याशी येऊ शकतो किंवा हे साठलेले पाणी पक्षी पिऊ शकतात ज्यामुळे जंतुसंसर्ग, कृमींची बाधा होण्याची शक्यता असते.

= बैठक व्यवस्थेची व स्वच्छतेची अशी काळजी घ्या

गादी पद्धतीने संगोपन करण्यात येणाऱ्या पक्षीगृहात पक्षांना बसण्यासाठी उंच प्लॅटफॉर्म असावेत. त्यामुळे जमिनीतील ओलाव्यापासून पक्षांचे संरक्षण होईल. तसेच त्यांच्या पायांना इजा होणार नाही आणि त्यास संसर्गही होणार नाही.

पक्षांच्या गर्दी करण्यामुळे, छताच्या गळतीमुळे तसेच हगवण या कारणांमुळे पक्षीगृहातील गादीचे तूस ओले होण्याची शक्यता असते. तसेच पक्षीगृहातील गाद्यांचे पेंड पडू शकते. त्यामुळे पक्षांच्या पायांना जखमा होण्याची शक्यता असते. यासाठी पक्षीगृहातील पक्षांची संख्या नियंत्रित ठेवावी.

पक्षाच्या गादीचा सामू ७.० च्या खाली राखल्यास अमोनिया वायू निर्मिती कमी होते. हा सामू ८.० च्या वर गेल्यास गादीचे लिटर मध्ये सुपर फॉस्फेट मिसळता येईल (१.०९ कि.ग्रॅ. प्रती १०.५ वर्ग फुटासाठी) ज्यामुळे अमोनिया वायू कमी प्रमाणात उत्पन्न होईल.

पक्षांचे लसीकरण वेळापत्रकानुसार करण्यात यावे. पक्षांना जंतनाशके/कृमीनाशके औषधी द्यावीत. पक्षीगृहात माशांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी पक्षीगृहाची नियमित स्वच्छता करावी.

वातावरणातील तापमान सरासरी तापमानापेक्षा कमी असल्यास पक्षीगृहात तापमान उबदार रहावे यासाठी उष्णतेची सोय करावी. दिवस लवकर मावळणे किंवा ढगाळ वातावरणामुळे लवकर अंधार होणे या बाबीमुळे अंडी उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो, यासाठी १२ ते १४ तासापर्यंत कृत्रिम प्रकाश उपलब्ध करावा जेणेकरून अंडी उत्पादन सुरळीत राहील.

पावसाळ्यात परसातील कुक्कुट पालनाद्वारे संगोपन करण्यात येणाऱ्या कोंबड्या खुडुक होण्याची शक्यता असते. त्यासाठी अशा कोंबड्याखाली प्रति कोंबडी १२ ते १५ अंडी उबवणुकीसाठी ठेवावीत.

परसातील कुक्कुटपक्षी पावसामुळे साचलेल्या पाण्यात वावरल्यामुळे पायास चिखल लागू शकतो. या चिखलाद्वारे पक्षीगृहात, खुराड्यात रोगजंतुंचे संक्रमण होऊ शकते. यासाठी पक्ष्यांना बाहेर सोडल्यास पक्षीगृहांची स्वच्छता करावी. शक्य असल्यास पावसात पक्षांना बाहेर सोडू नये. खुराड्यातचं खाद्य व पाण्याची व्यवस्था करावी. परसातील कुक्कुट पालनाद्वारे संगोपन केल्या जाणाऱ्या कोंबड्या पाऊस सुरू झाल्यास पक्षीगृहात येतील / परततील याची दक्षता घ्यावी.

कोंबड्या आजारी असल्याची शंका आल्यास पशवैद्यकाच्या सल्लयाने उपचार करावेत. उघड्यावर मृत कोंबड्या टाकू नयेत तसेच मृत कोंबड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी.

**(संकलन - जिल्हा माहिती कार्यालय, सांगली)**

## त्या राडेबाज शिक्षकाला पाठीशी घालणाऱ्या गटशिक्षण अधिकाऱ्याला बडतर्फ करा

लातूर (प्रतिनिधी)– निलंगा पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड यांच्या मनमानी / तुघलकी/अनागोंदी कारभाराची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करून त्यांना सेवेतून तत्काळ बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी छावा संघटना व भीम आर्मी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे..

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, निलंगा पंचायत समिती येथे कार्यरत असलेले गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड हे मागील तीन वर्षापासून येथेच कार्यरत आहेत.

ते अत्यंत बेजवाबदार पणाचे वर्तन करतात त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या तुघलकी कार्यपद्धतीमुळे निलंगा तालुक्यातील सामान्य कुटुंबातील मुले/मुली शिक्षण घेत असलेल्या अनेक गावातील जिल्हा परिषद शाळा डबघाईस आलेल्या आहेत. बहुतांश शाळांमधील गुणवत्ता ढासळलेली आहे. शिवाय ते त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी त्यांच्या मनमानी कार्यपद्धतीमुळे ते येथील काही मुठभर चांडाळ चौकडीला हाताशी धरून आजपर्यंत चुकीचे निर्णय घेत आलेले आहेत.

त्यांच्या समंधातील काही शिक्षकांच्या सोयीसाठी प्रामाणिक कार्यक्षम शिक्षकांवर अन्याय करण्याचा त्यांनी धडाका चालू ठेवलेला आहे. त्यांच्या या चुकीच्या वर्तनाने निलंगा तालुक्याचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.

पर्यायाने गरिबांची/सामान्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अनेक पिढ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या सर्व बाबीला सर्वस्वी निलंगा पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड हेच कारणीभूत व जवाबदारही आहेत.

ते काही शाळांमधून बेसिस्त वर्तन करणाऱ्या शिक्षकांची पाठराखण करण्यास सुरेश गायकवाड हे माहिर आहेत.

याबाबतचे ज्वलंत उदाहरण सांगायचे म्हटले तर निलंगा तालुक्यातील

मौजे गुऱ्हाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वादग्रस्त व राडेबाज शिक्षक सपकाळे पांडुरंग तुकाराम हे मागील अनेक वर्षापासून कार्यरत असून हे शिक्षक शाळेत बेशिस्त वर्तन करून शालेय शिस्तीचा भंग करीत असल्याबाबत या शाळेच्या मुख्याध्यापकाने गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती निलंगा यांच्याकडे त्या शिक्षका बद्दल अनेकवेळा लेखी तक्रारी देऊन कळविलेले आहे.

मात्र संबंधित गट शिक्षण अधिकारी हे त्या शिक्षकाची जाणीवपूर्वक पाठराखण करीत असून त्या शिक्षका विरोधात ठोस कारवाई न करता,वरिष्ठांकडे कारवाई बाबतचा अहवाल न पाठवता त्या शिक्षकाला पाठीशी घालून दाद मागणाऱ्या मुख्याध्यापका विरोधातच कारणे दाखवा नोटीस देऊन शासनाने त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा दुरुपयोग करून स्वतः च्या स्वार्थासाठी चोर सोडून संन्यासाला फाशी देण्याचा तुघलकी प्रकार चालविला आहे.

अश्या बेजबाबदार गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड यांची निः पक्षपातीपने,सखोल,उच्चस्तरीय ,स्वतंत्र यंत्रणे मार्फत पारदर्शकपणे चौकशी करून अश्या जिल्हा परिषद शाळा बंद पाडण्याचा कट रचणाऱ्या गटशिक्षण अधिकाऱ्याला तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अन्यथा छावा संघटनेच्या व भीम आर्मीच्या संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने दिनांक २१ जुलै २०२५ रोजी पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालया समोर अन्नत्याग आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर छावा संघटनेचे निलंगा तालुका अध्यक्ष तुलसीदास साळुंके व भीम आर्मी चे तालुका अध्यक्ष अतुल सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## झरोका

एक – अनेक विषयावर आंदोलन झाले, दंगल झाली किंवा कोणत्या विषयावरुन वादळ निर्माण झाले की सरकारी आतीताई नंतर राष्ट्रीय स्वंयसेवक संघ जागा होतो आणी शांततेचे आव्हाण करतो. न्याय व हक्काची भाषा करतो ही काय भानगड आहे तेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, तूझं डोकं ठिकाणावर आहे ना, अचानकपणे राष्ट्रीय स्वंयसेवक संघाबद्दल कसा काय बोलतो आहेस, काय घडलं, घडते आहे ते तरी सांग.

एक – अहो, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ हा जातीयवादी, हिंदूत्ववादी संघटना आहे, त्या काय करावे, करु नये हा त्यांचा अधिकार आहे. परंतू गेल्या दोन वर्षापासून मनीपूर जळते आहे, जाळपोळ, अन्याय, अत्याचार, बलात्कार वगैरेमुळे मैतेई, कूकी समाज तणावात जगतो आहे तिथले भाजपा सरकार कांहीच करीत नाही परंतू आता राष्ट्रीय स्वंयसेवक संघ तिथं शांतता निर्माण करु पाहतोय. औरंगजेबाच्या समाधीवरुन रणकंदन सुरु झाले, नागपूरात दंगल झाली, नंतर आरएसएसने शांततेचे आवाहन केले. परवा मुंबईत हिंदी सक्तीवरुन मुंबईत वादळ उठले, आंदोलन पेटले त्यावर सक्ती नकोच सर्वच भाषाचा आदर महत्वाचा पण दांडगाई नको म्हणून सारवासारव केली हे त्यांचे गौडबंगाल, नौटंकी काय तीच कळत नाही म्हणूनच बोलतोय.

दुसरा – अरे, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपा, हिंदू महासभा, विश्वहिंदू परिषद, अभाविप, वगैरे, वगैरे संघटना या जातीयवादी हिंदूत्ववादीच आहेत, मूँह मे राम, बगल मे सुरी, हेच त्यांचे वर्तनं असते. आंदोलन, दंगल, वादळानंतरच शांतता हे त्यांचे एक सोंग, ढोंग असते. आतातर आरएसएसची शताब्दी वर्ष आहे, काय काय होते, करतात, घडवितात ते पाहात राहा. समजले.

## काय बोलता राव ?

महाराष्ट्र विधीमंडळात विरोधी पक्षनेता नाही. जाणीवपूर्वक विरोधी नेता निवड केला जात नाही, असा आरोप करुन विरोधी पक्षाच्या आमदारानी अधिवेशनाच्या चर्चेत सहभागी होवून पून्हा सरन्यायाधिश भुषण गवई यांच्या सत्काराचे निमित्त करुन सभात्याग केला. परंतू विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकरानी विरोधीपक्षनेत्याचे नांव देण्यासाठी तूम्हाला चार महिणे लागले मग आम्हालातर सरकार चालवित, चालवितच निर्णय घ्यावा लागतो त्यास विलंब लागणारच असे नार्वेकरानी विरोधकाना सूनावताच विरोधी पक्षाचे गटनेते आ. भास्कर जाधव यानी मग आम्हाला हे सरन्यायाधिशाना सांगावे लागेल असा दम भरला.

### काय बोलता राव !

अरे, मागील काळात कर्नाटक विधीमंडळ अध्यक्षाने असेच विधेयके प्रलंबीत ठेवली होती त्यास सरन्यायाधीश भुषण गवई यानी सूनावले होते, अशा अनेक प्रकरणासह मराठा आरक्षणाच्या सुनावणीसाठी स्वतंत्र न्यायकक्ष निर्माण करा असे सूचित केले होते. सरन्यायाधिश भूषण गवई न्यायीक, पारदर्शक, तात्काळ निर्णय घेणारे, देणारे असल्याने विरोधी पक्षाचे, गटनेते आ. भास्कर जाधव यानी विधीमंडळ अध्यक्ष नार्वेकर यांच्या प्रलंबित विरोधीपक्षनेता निवडप्रकरणी तर मग आम्हाला सरन्यायाधिश भुषण गवई याना सांगावे लागेल असा इशारावजा सज्जड दम दिला मग काय बोला दाजीबा !



# गावठाण विस्तार आणि तुकडेबंदी कायदा. महसूल मंत्री बावनकुळे यांचे अभिनंदन.

५० लाख लोकांना मिळणार जागेची मालकी.सातबारा आणि प्रॉपर्टी कार्ड.तुकडे बंदी कायदा तूर्त शिथिल.नंतर रद्द करणार.महसूल मंत्री बावनकुळे १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेल्या व्यवहारं नियमित करणार.सरकारची घोषणा.भूतकाळ बदलता येत नाही.भविष्यकाळ माहित नसतो.म्हणून वर्तमानात जगा. असे एकवीरापुत्र भगवान बुध्दांनी २५०० वर्षापूर्वी सागितले होते.बऱ्याचदा आम्ही भूतकाळात जगत असतो.मंगळावर आणि चंद्रावर जाण्याच्या स्वप्निल भराऱ्या मारून पृथ्वीवरचे वर्तमान प्रश्र्न दुर्लक्षित करत असतो.जमिनीवरचे प्रश्र्न नाकारून आकाशातली नसलेली मोक्ष मुक्ती महत्वाची मानणारी वैदिक हिंदू संस्कृती आहे.भारतीय संविधानाच्या जमिनीवरच्या माणसाला न्याय देऊन,आभासी देव स्वर्ग,चमत्कार,मोक्ष नाकारणारा विचार हा वर्तमान भारताच्या संविधानाचा विचार आहे.

भारतीय जनता पार्टीच नाही,तर देशाच्या राज्याच्या सत्तेत असलेल्या लोकांना ही साविधानिक मूल्ये कधी समजली नाहीत.मग ती कॉंग्रेस शिवसेना,राष्ट्रवादी उजवे डावे कुणीही असोत. हा विचार इथल्या मातीतला भगवान बुद्धांच्या मानवी कल्याणाचा करुणेचा विचार आहे.तरीही भाजपा मधून महसूल मंत्री झालेले चंद्रशेखर बावन कुळे हे आतापर्यंतच्या सरंजामी जमीनदार मुख्यमंत्र्यांपेक्षा,महसूल मंत्र्यांपेक्षा वेगळे ठरले.

वास्तववादी ठरले.त्यांचे विशेष आभार.विशेष अभिनंदन.

भाजपा सरकारने अलीकडेच आणलेला जन सुरक्षा कायदा हा ८५ टक्के स्त्रीशूद्र अतिशूद्र यांच्या विरोधी असलेल्या,मनुस्मृतीच्या मानसिकतेतून उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या १५टक्के लोकांच्या सुरक्षेचा कायदा आहे.आम्हा ओबीसी एससी एसटी स्त्रिया यांच्या विरोधातला कायदा आहे.मनुस्मृती सारखे दुसऱ्यांचे मानवी अधिकार नाकारताना त्यांना शूद्र,अतिशूद्र,देशद्रोही,अतिरेकी,नक्ष लवादी,अस्पृश्य,हलके,गुलाम ठरविणे ही वैदिक ब्राह्मणी संघीय वृत्ती आहे.तरीही भाजपाने जमिनीवरचे सत्य समजून घेतलेल्या चागल्या निर्णयाचे स्वागत करणे हे आपल्यातल्या विवेकी संवेदन शील नागरी मनाचे,मोठेपण आम्ही जपले पाहिजे.तेच आमचे भारतीयत्व आहे.तोच आमचा राष्ट्रवाद आहे.२०१६ /१७ मध्ये महाराष्ट्र सरकारने मुंबईच्या सात बेटांच्या जमिनीचे मूळ मालक असलेल्या आगरी कोळी भंडारी आदिवासी ईस्ट इंडियन यांना अतिक्रमित,अनधिकृत ठरविले.

झोपडपट्टी विकसित नव्हे? उध्वस्त करून बिल्डरांचा फायदा करणारा एस आर ये अर्थात गलिच्छ वस्ती सुधारणा कायदा लावला.यातही या वस्त्यात राहणारे ओबीसी एससी एसटी अल्पंख्यक लोक गलिच्छ घाणेरडे आहेत.असे म्हटले. अर्थात हा अट्रासीटी सारखाच गुन्हा होता.आमचे मागास वर्गीय लोक,साहित्यिक विचारवंत सावध नसल्यामुळे हा गलिच्छ वस्ती सुधारणा कायदा आमच्या वस्त्या बुलडोझने पाडत सुटला आहे. आमचे आर्थिक,सामाजिक,राजकीय जीवनही उध्वस्त करतोय. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची लोकशाही मनुस्मृती नुसार चालवण्याचे कौशल्य ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्याकडे आहे.सत्य ओळखण्यात आमच्या चळवळी आजही अपयशी ठरतात.मी आभारी आहे ज्यांनी माझ्यापर्यंत महाकारूनिक भगवान बुद्धाचा, प्रत्येक क्षण जागरूकतेने जगण्याचा विचार पोहचविणाऱ्या, बुद्धिमान आंबेडकरी कार्यकर्त्यांसाठी.कोळीवाडे गावठाणे ही मुंबईच्या मालकांची निवासस्थाने अनधिकृत, अतिक्रमित कशी? असा प्रश्र्न भाजपाचे आमदार ॲड. आशिष शेलार यांना वरळी कोळीवाडा मुंबई येथील जाहीर सभेत मी विचारला.

सरकारची अशी आमच्या ओबीसी विरोधी वृत्ती असेल? तर आम्ही उच्चवर्णीय ब्राह्मण मराठा वैश्य आमदाराना का निवडून द्यावे?.या प्रश्र्नावर आत्मचिंतन करून आमदार आशिष शेलार यांनी कोळीवाडा गावठाण प्रश्र्न विधानसभेत मांडण्याचे आश्र्वासन दिले.आणि पूर्ण केले.त्यानंतर महसूल मंत्री चंद्रकांत दादा पाटील.आजचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभेत तसा ठराव घेऊन कोळीवाडे आणि गावठांचे सीमांकन सुरू केले. आज ही चळवळ थांबली.केवळ १२ कोळीवाडे सीमांकित झाले. प्रश्र्न २०० गावठाणांचा बाकी आहे.प्रलंबित आहे.त्याला जागृत नसलेले,आपल्या जमीन मालकी साठी पैसे,वेळ खर्च करण्यात निष्क्रीय असणारे,ग्राम सभा,गाव कमिटी न करणारे आमचे आगरी कोळी भाऊ बहिणी जबाबदार आहेत.हे मी खेदाने सांगतोय. तरीही रस्त्यावर येऊन लोकांची गावठाण विस्तार व्यथा ऐकणारे आमदार आशिष शेलार यांना प्रश्र्न मांडण्याचे हे ऐतिहासिक श्रेय मी देत राहणार.७० वर्षाच्या सत्ताकाळात कॉंग्रेस शिवसेना राष्ट्रवादी उजवे डावे यांना मुंबईच्या मूळ गावठाण वाढीचा प्रश्र्न का कळला नसेल? हा चिंतनाचा विषय आहे.गरीब,ओबीसी, एससी एसटी अल्पसंख्याक यांच्या विरोधातली मनुस्मृती भाजपा सह सर्व राजकीय पक्षात सुखनैव नांदत आहे.दोष मनुवाद्यांचा नाही.तर संविधानवादी,फुले,शाहू आंबेडकरवादी आम्हा गुलाम मानसिकतेच्या स्त्री शूद्र अतिशूद्र अल्पसंख्यांक यांचा आहे. रस्त्यावर लढण्यात ते कमी पडताहेत.भारतीय संविधानात आर्टिकल ४०हे गावे,ग्रामसभा,गावठाण विस्तार नियोजन करण्याचे वचन नागरिकांना देते.आमच्या देशाने आतापर्यंत एकाही मूळ गावाचे नियोजन दर दहा वर्षांनी वाढत जाणाऱ्या नैसर्गिक लोकसंख्या वाढीनुसार केलेच नाही.

शेतीच्या,समुद्र,जंगल शेतीच्या बाजूला कष्टकरी शेतकरी राहतो.उच्चवर्णीय नगरात राहतात.ओबीसी एससी एसटी यांची मुले नातवंडे वाढल्या नंतर काय करायचे? कधी स्वतः च्या किंवा विकत घेतलेल्या गुंठा किंवा अर्धा गुंठा जागेत तो स्वतः घर बांधतो.यांची नोंद घ्यायला कधी प्रत्यक्ष जागेत मुंबईचा तलाठी,सर्कल,तहसीलदार,भूमी अभिलेख कर्मचारी गेला असता? तर सत्य समोर आले असते.आपल्याच मालकीच्या जागेत शेतकरी घर बांधून राहतो.ही गोष्ट हाकेच्या अंतरावरील मंत्रालयातल्या आमदार,महसूल सचिव,महसूल मंत्री,मुख्यमंत्री अगदी पोलिस यांनाही कळली नाही.

देशातली सामान्य माणसाची व्यथा ज्या लोकप्रतिनिधी,प्रशासन,यांना कळत नाही ती वकील,न्यायालये यांना. कळणार कशी? न्यायालये वास्तव समजून न घेता गावकऱ्यांचा विरोधात निर्णय देत आहेत.यामुळे मुंबई नवी मुंबई येथील घरे गावठाणे अतिक्रमित ठरवून नगर विकास मंत्री तोडत सुटले आहेत.मराठ्यांच्या वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असल्यापासून एकनाथ शिंदे या मराठा मंत्र्याचा त्रास लोकनेते दि बा पाटील यांच्या प्रकल्पग्रस्त आगरी कोळी लोकांना होतोय.आमचे वकील प्रत्यक्ष जमिनीवरच्या अनुभवातून वकिली शिकत नाहीत. चवदार तळे,चिरनेर जंगल आंदोलन कुळ कायदा.मनुस्मृती दहन ही रस्त्यावरची विषमते विरोधातली जनतेची आंदोलने जी भारताच्या सर्वात मोठ्या वकिलाने बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केली. ती आंदोलने आजचे वकील करतात का?अर्थात पुस्तके वाचून कायदा समजतो का? जे अनुभवाने शिकत नाहीत.ते संविधान काय समजून घेणार?माझ्या संपर्कातील वकिलांकडून याचा मला अत्यंत वाईट अनुभव आलाय.तलाठी गावात जात नाहीत. त्यामुळे असुनी खास मालक घरचा म्हणती चोर त्याला हा भयंकर अनुभव पोलिस,जेसीबी मशीन घेऊन.येणारे बिल्डर,एसआरए चे अधिकारी,महा नगर पालिका,सिडको,नैना अतिक्रमण विभाग यात मी रोज घेत आहे.माझे आणि गरिबांचे दुःख फार मोठे आहे.

शेतीखालील जमीन सुरक्षित रहावी.त्याचा घरे किंवा इतर कामासाठी उपयोग करून शेती नष्ट होऊ नये.या उदात्त हेतूने तुकडे बंदी कायदा केला गेला.परंतु महाराष्ट्राच्या पहिल्या मुख्यमंत्र्याला आतापर्यंत १० ते १५ नातवंडे झाली असतील. तेवढीच तलाठ्याला आणि शेतकऱ्याची असतील?.मग या वाढत्या लोकसख्येला मेल्यानंतर स्वर्गात न्यायची सोय भटजी करू शकले नाहीत.आत्मा पिंडदानातू पोहचला की नाही? हे त्यांनाच माहीत.माणसे मात्र इथेच गावठाणात राहिली.हजार फुटांच्या घराची नोंद घेणारा कायदाच नव्हता.शिवसेनेचे संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत कालबाह्य झालेल्या तुकडेबंदी. कायद्यावर लक्षवेधी सूचना मांडली होती.साऱ्या राज्यात तुकडे बंदी कायद्याचे उल्लंघन झाले आहे.सारा देश मग गुजरात राजस्थान जेथे आलाय म्हणजे मीरा भाईंदर,ठाणे रायगड मुंबई पालघर येथे महाराष्ट्र भारतातून स्थलांतरित झालेल्या आणि आम्ही बंधुतेने स्वीकारलेल्या लोकांना विस्तारित गावठाण प्रश्र्न जास्त सतावत आहे.मंत्रालय मुंबईत असूनही,मुंबई देशाची राजधानी असूनही,मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा प्रश्र्न सोडवला पाहिजे असे मला वाटते.

मूळ गावठाण हे दर दहा वर्षांनी नैसर्गिक वाढत्या लोकसंख्येनुसार २०० मीटर वाढले पाहिजे.गावठाण विस्तार नियम हे सांगतो.आम्ही आगरी कोळी भंडारी लोकांनी साऱ्या महाराष्ट्र आणि देशाला कोळीवाड्यात स्वीकारले तर गावठाण हद्द किलोमिटर मध्ये वाढली पाहिजे.उरण पनवेल मध्ये अनेक गावठाण प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड महसूल विभागात पडून आहेत.सिडकोच्या नावावर परंतु प्रत्यक्ष ताबा सिडको जन्मऱ्या अगोदर पासून आमच्याकडे असतानाही या घराच्या नोंदी इथला तहसीलदार घेत नाही.नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे ही गावे विकू पाहतात.मंत्रीमंडळ ब्राह्मण मराठा शूद्र या वादात अडकले आहे.लोकांना न्याय देणार कोण?

विस्तारित गावठाणातील गुंठेवारी नोंदविण्यात सरपंच,ग्रामसभा,तलाठी,ग्रामसेवक निष्क्रीय होते,आज आहेत. तहसील दार जिल्हाधिकारी प्रांत हे मुंबईलां पैसे कमवायला येतात.ही गोष्ट सरकारला तपासायची असेल ? तर एक दिवस मला ईडीच्या प्रमुखपदी बसवा.शासनाचा बुडालेला महसूल मी जमा करतो.बाकी इथल्या आमदार,खासदार, मंत्री,वकील सॉलिसिटर,दलाल यांनाही इडी न्यायिक समानतेने लावावी.ही लोकांची इच्छा आहे.मुंबई ठाणे रायगड पालघर येथे गुंठा भर जागेत लोकांनी घरे बांधलीत. त्यांच्या नोंदी महसूल दरबारी घेण्यासाठी तत्काळ कोकण आयुक्त,जिल्हाधिकारी यांना आदेश शासनाने दिले,तर ही घरे अधिकृत प्रॉपर्टी होऊन त्यांची मालकी नागरिकांना मिळू शकते.त्यावर कर्ज काढता येईल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपा जो राष्ट्रवाद सांगतोय त्यात पहिली आमच्या घराखालची जमीन,गावठाणातली जमीन आम्हाला द्या.ही विनंती आहे.आमच्यासाठी एक गुंठा घराखालची जमीन हेच आमचे राष्ट्र आहे.भारत माझा देश आहे.या शाळेत शिकवलेल्या प्रतिज्ञेचा प्रत्यक्ष अनुभव असेल.वर्तमानात तो फार वाईट आहे. परकेपणाचा गुलामीचा अनुभव आहे.अयोध्येच्या क्षत्रिय श्रीरामाला घर,मंदिर हवे. त्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. पंतप्रधान मोदींनी ते दिलेही.परंतु उरणच्या राजाराम पाटलाला,एका शूद्र ओबीसी माणसाला हक्काचे अधिकृत घर नको का?

कसेल त्याची जमीन राहील त्याचे घर हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर,आगरी नेते नारायण नागू पाटील. लोकनेते दि बा पाटील यांचा स्त्री शूद्र अतिशूद्र यांच्या जमीन हक्कांचा राष्ट्रवाद घेऊन मी निघालोय.कधी आमदार आजचे मंत्री मां.आशिष शेलार तर कधी महसूल मंत्री चंद्रशेखर बावन कुळे हे याच मार्गावर चालले? तर भारताचा साविधानिक राष्ट्रवाद प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहचेल ? अशी आशा वाटते.

जय भीम.

**राजाराम पाटील ८२८६०३१४६३.उरण जिल्हा रायगड.**

## इतिहासात आजचा दिवस १३ जून २०२५

अंतरराष्ट्रीय

१७९४ – व्हॉस्गेसची लढाई.

१८३२ – हेन्री रोव स्कूलक्राफ्टने मिसिसिपी नदीचे उगम स्थान शोधले.

१८६३ – सक्तीच्या सैन्यभरतीविरुद्ध न्यूयॉर्क शहरात दंगल.

१८७८ – १८७८चा बर्लिनचा तह – सर्बिया, मॉंटेनिग्रो व रोमेनिया ओट्टोमन साम्राज्यातून वेगळे झाले.

१९०८ – ऑलिंपिक स्पर्धांमध्ये स्त्रीयांना भाग घेण्यास परवानगी.

१९०९ – कॅनडातील कोक्रेन, ऑन्टारियो शहराजवळ जमिनीत सोने सापडले.

१९४१ – दुसरे महायुद्ध – मॉंटेनिग्रोत जर्मन वा इटालियन राजवटीविरुद्ध उठाव.

१९७७ – न्यूयॉर्कमधील वीजपुरवठा २५ तास खंडित. अंधारपटात लुटालुट, मारामारी व गुंडगिरीचा सुकाळ.

१९८३ – श्रीलंकेत वांशिक हत्याकांड. ३,००० तामीळ व्यक्तींची हत्या. ४,००,००० हून अधिक तामीळ व्यक्तींचे युरोप व कॅनडा व भारतात पलायन.

२००५ – पाकिस्तानच्या घोटकी रेल्वे स्थानकात तीन रेल्वे गाड्या एकमेकांवर आदळल्या. १५० ठार.

२००६ – इस्त्राईलने बैरुत विमानतळावर हल्ला चढवला.

२००६ – गाजा पट्टीवर इस्त्राइली विमानांच्या बॉम्बहल्ल्यात २३ पॅलेस्टीनी ठार झाले.

२००७ – पाकिस्तानमधील लाल मशीदीत कट्टरवाद्यांना संपवण्यासाठी करण्यात आलेल्या लष्करी कारवाईत १०२ जण ठार झाले.

राष्ट्रीय

१६६० – शिवाजी महाराजांची सहीसलामत सुटका करण्यासाठी घोडखिंड लढविणारे शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांचे प्राणार्पण.

१९१२ – मौलाना अबुल कलाम आझादनी अल हिलाल या उर्दू भाषेतील नियतकालिकाचे प्रकाशन सुरू केले.

२००७ – प्रसिद्ध गीतकार समीर यांना काशी गौरव पुरस्कार मिळाला.

जन्म

१५९० – पोप क्लेमेंट दहावा.

१६०८ – फर्डिनांड तिसरा, पवित्र रोमन सम्राट.

१८०८ – पॅट्रिस मॅकमहोन, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.

१८९३ – प्रसिद्ध गायिका केसरबाई केरकर.

१९४० – पॅट्रिक स्टुअर्ट, इंग्लिश अभिनेता.

१९४२ – हॅरिसन फोर्ड, अमेरिकन अभिनेता.

१९४५ – ऍशली मॅलेट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

१९५३ – लॅरी गोम्स, वेस्ट इंडीझचा क्रिकेट खेळाडू.

१९५४ – रे ब्राइट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

१९६४ – उत्पल चटर्जी, भारतीय क्रिकेट खेळाडू.

निधन

९३९ – पोप लिओ सातवा.

१७६१ – तोकुगावा लेशिगे, जपानी शोगन.

१७९३ – ज्यॉं पॉल मरात, फ्रेंच क्रांतीकारी.

१९८० – सेरेत्से खामा, बोत्स्वानाचा पहिला राष्ट्राध्यक्ष.

१९९० – क्रिकेट सामन्याचे अतिशय सुदंर धावते वर्णन करणारे प्रसिद्ध क्रीडा–समीक्षक बॉबी तल्यारखान.

## (गुरु वचन) परमेश्वराचे नामस्मरण करा

मानवी शरीर परमेश्वराच्या कृपेने आणि केवळ परम ेश्वराच्या प्राप्तीसाठीच मिळते. यासाठी सर्व काम सोडून परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. ज्यांचे वय जास्त झाले आहे, त्यांना परमेश्वराचे नामस्मरण करणे आहेच, पण ज्यांचे वय कमी आहे, त्यांनीही स्वच्छ मनाने परम ेश्वराचे नामस्मरण करावे लागणार आहे. सृष्टीतील सर्व कामे करायची आहेत पण आपला मुख्य हेतू आणि लक्ष्य केवळ परमेश्वराला प्राप्त करणे असावे. अस्तित्त्वामध्ये सत्ता एका परमात्म्याची आहे. संसाराकडे ध्यान दिले ते सर्व नष्ट होणार आहे आणि निरंतर नष्ट होत राहील. आपण आपल्यापरीने पहायला हवे की, आपण जेव्हा जन्मलो त्यावेळी शरीराची कशी अवस्था होती व आज कशी आहे.

संसार नेहमी बदलणारा आहे तर परमात्मा कायम स्वरुपी आहे. परमात्मा आपला आणि आपण परमात्म्याचे आहोत. या दृढता असायला हवी. एखादा लहान मुलाला आईविषयी विचारले तर तो म्हणते ती माझी आई आहे. परंतु आई का आहे याचे तो उत्तर देत नाही. त्याच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की आई त्याची का आहे. आई त्याची आहे याविषयी काही संशय नाही. अशाप्रकारे आपणही संशय करु नका आणि ही गोष्ट पूर्ण विश्वासाने निश्चित करा की, परमेश्वर माझा आहे आणि परमेश्वराशिवाय दुसरे काहीही माझे नाही. कारण ते बाकी सर्व तुम्हाला सोडून जाणार आहेत. ज्याच्याविषयी आपण चिंतेत राहतात. पैसे, घर, जमीन सर्वकाही आहे तिथेच राहणार आहे आणि त्याचे स्मरणही राहणार नाही.

स्मरण राहील तर परमेश्वराचे. जर आपल्याला स्मरण राहत असेल तर तुम्ही सांगा आपण या जन्मापूर्वी कोठे होता. आपले आई–वडिल, भाऊ–बहीण, स्त्री–पुरुष आदी कोन होते, आपले घर कोणते होते. जसे पूर्वजन्माची आठवण नाही तसेच या जन्माचीही आपल्याला आठवण राहणार नाही. ज्याची आठवणही होणार नाही, त्यासाठी आपण विनाकारण परेशान होत आहात.

## उपदेशकथा आळसावर उपाय

एक तरुण वेदाभ्यास केल्यानंतर लग्न करून संसारास लागला. त्याची बायको रोज पोटदुखीचं कारण सांगून दिवसभर झोपून राहात असे. हा बिचारा सर्व घरकाम करीत असे. नवऱ्यानं रांधलेला स्वयंपाक मात्र तिला आवडत असे. जेवण केल्यावर पुन्हा तिची पोटदुखी सुरु होत असे. तिचा पती मात्र दिवसेंदिवस काळजीने खंगत चालला. एकदा त्याचे गुरू भेटल्यावर त्याने ही सर्व हकीकत सांगितली. गुरूंना बाईच्या पोटदुखीचं कारण लक्षात आलं. ते म्हणाले, ‘हा काढा तिला प्यायला दे. मात्र, तिने हे औषध नाही घेतलं तर या दंडुक्यानं दोन तडाखे दे. तिचं दुखणं पळून जाईल.’ बाईनं औषध घेण्यास नकार दिला. तिच्या नवऱ्यानं दंडुक्याचा प्रयोग करावा लागेल, असं सांगताच तिनं औषध न घेता मी बरी होईन, असं सांगितलं व दोन दिवसांची मुदत मागून घेतली. तिचा रोग तात्काळ बरा झाला.

कथा उपदेश : आळसाच्या रोगावर रामबाण औषध सापडते. त्याचा चतुराईनं वापर करणारा वैद्य हवा.

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांचा मुंबईत सोमवारी मोर्चा कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांची माहिती : कायमस्वरूपी रोजगाराची मागणी

लातूर : राज्यातील १ लाख ३४ हजार मुख्यमंत्री युवा कार्य



प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रोजगार द्यावा, या प्रशिक्षणार्थ्यांचे मानधन वाढवून द्यावे, यासह विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेच्यावतीने मुंबईत सोमवारी (दि.१४) विधान भवनावर मोर्चाचा इशारा संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी शनिवारी येथे पत्रकार परिषदेत दिला. याप्रश्र्नी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्यातील बेरोजगारी संपुष्टात आणण्याच्या उदात्त हेतूने १० लाख युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना पूर्व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या काळात आणली. या योजनेच्या माध्यमातून १ लाख ३४ हजार प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षण योजनेमध्ये सहभाग नोंदवला. सुरुवातीला सहा महिन्याचे प्रशिक्षण होते. त्यानंतर संघटनेच्यावतीने आझाद मैदानावर मागील अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात बेमुदत उपोषण केल्यानंतर व विविध चार मोर्चे काढल्यानंतर प्रशिक्षण कालावधी ११ महिन्यांचा केला गेला. त्याचे प्रमाणपत्र ही संबंधित प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येईल. मात्र ते प्रमाणपत्र कोणत्या उपयोगात येणारे आहे? हे अद्याप स्पष्ट होत नाही, असे सांगत या प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

बारावी किंवा आयटीआय पास प्रशिक्षणार्थ्यांस २० हजार रुपये, डिप्लोमा होल्डर प्रशिक्षणार्थ्यांस २५ हजार रुपये आणि पदवीधर प्रशिक्षणार्थ्यास ३० हजार रुपये मानधन द्यावे, शासकीय व निमशासकीय सेवेत १० टक्के आरक्षण द्यावे, यासह इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष अनिकेत मांदळे, गोविंद टोम्पे, शुभम पांचाळ, आकाश सावंत, गंगाधर कुमठेकर, सुजितकुमार शिंदे आदी अनेक प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गाव भागातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विस्तारित नवीन रुग्णालयाच्या इमारत बांधकामाची केली पाहणी

लातूर (प्रतिनधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज शनिवार दि. १२ जूलै २५ रोजी दुपारी लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने येथील पटेल चौक भागात उभारण्यात येत असलेल्या विस्तारित स्त्री व बाल रुग्णालय बांधकामाची तेथे जाऊन पाहणी केली. सदरील बांधकाम दर्जे दार पद्धतीने लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी संबंधितांना केल्या आहेत.



यावेळी ते म्हणाले, सदरील विस्तारित रुग्णालय मी वैद्यकीय शिक्षण विभागाचा मंत्री आणि लातूर जिल्ह्याचा पालकमंत्री असताना मंजूर करण्यात आलेले आहे, हे रुग्णालय जवळपास १०० कोटी रुपये खर्च करून अद्ययावत सोई सुविधांसह उभारण्यात येणार आहे. दोन तळघर, तळमजला आणि ५ मजले असलेले हे २०० खाटांचे हे भव्य रुग्णालय आहे. लातूर शहर आणि जिल्ह्यातील महिला व बालकांना चांगले उपचार मिळावेत हा या रुग्णालय उभारणीमागचा उद्देश असल्याचेही त्यांनी यावेळी सांगीतले.

यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, सार्वजनिक बांधकाम लातूर उपविभाग क्रमांक एक च्या कनिष्ठ अभियंता शुभेच्छा बोरवटकर, साईट मॅनेजर योगेश पाटील, विलास को–ऑपरेटिव्ह बॅंकेचे व्हाईस चेअरमन ड. समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, गोरोबा लोखंडे, ड. गोपाळ बुरबुरे, सत्तार शेख, अभिषेक पतंगे, दगडूआप्पा मिटकरी, इमरान सय्यद, महेश काळे, विष्णुदास धायगुडे, युनुस शेख, सचिन पंचाक्षरी, इसरार पठाण, ड. किशनराव शिंदे, अरफात खान आदिसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

## बाभळगाव निवासस्थानी शारदा सहकारी गृहनिर्माण सोसायटी शिष्टमंडळाने घेतली भेट; रस्ते जोडणी आणि रुंदीकरणाच्या मागण्या

लातूर (प्रतिनधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांची आज शनिवार, दि. १२ जुलै रोजी सकाळी बाभळगाव येथील निवासस्थानी लातूर शहरातील शारदानगर तसेच विशाल नगर मधील नागरिकांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली, शारदानगर ते आंबेजोगाई रोड आणि श्री साई मंदिर ते शहरातील मुख्य रस्ता या रस्त्याच्या कामाबद्दल या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतले, सदरील समस्या सोडवण्याबाबत त्यांना ग्वाही दिली.



यावेळी माजी महापौर ड. दीपक सूळ, डॉ. बालाजी साळुंके, बालाजी मुस्कावाड, विजय टाकेकर, आकाश भगत, मुकेश राजेमाने, शारदा सहकारी गृहनिर्माण सोसायटी, लातूरचे अध्यक्ष प्राध्यापक तुकाराम नारायणकर, प्रा. बी.एस. पळसकर, प्रा.ओमप्रकाश साकोळकर, प्रा. शिवराज भुजबळ, प्रा.शिवानंद स्वामी, प्रा. दत्तात्रय पत्रावळे, आबासाहेब शिंदे आदिसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

## जागतिक लोकसंख्या दिन : सुखी जीवनाचा उपाय लोकसंख्या वाढीवर मात

जागतिक लोकसंख्या दिन – ११ जुलै २०२५ दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन ११ जुलै रोजी प्रत्येक वर्षी संपुर्ण विश्वात साजरा करण्यांत येतो. ११ जुलै १९८७ रोजी जगाची लोकसंख्या १ अब्ज झाल्याचे संयुक्त राष्ट्रीय कौन्सिलींग यांच्या निदर्शनास आले. तेंव्हापासुन ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यांत येतो. प्रथम जागतिक लोकसंख्या दिन हा ११ जुलै १९८९ रोजी साजरा झाला. सतत वाढणाऱ्या लोकसंख्येचे दुष्यपरिणामांबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने ११ जुलै रोजी दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. या वर्षीचे घोषवाक्य खालील प्रमाणे आहे. 'आई होण्यासाठी योग्य वय तेंव्हा, शरीर व मनाची तयारी जेंव्हा '

जगामध्ये वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक दाम्पत्याने कुंटूंब नियोजनाची जबाबदारी घेऊन यशस्वी पार पाडावी. लोकसंख्यावाढी मुळे विविध समस्याला तोंड द्यावे लागणार हे लक्षात येताचं शासनाने पंचवार्षिक योजना १९५१–५२ या मध्ये कुंटुंब कल्याण कार्यक्रमाचा अंर्तभुत करुन १९५२ पासुन राष्ट्रीय कुंटुंब कल्याण कार्यक्रम अंमलात आणला. आपणांस ज्ञातचं असेल की, जगामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश भारत प्र

थक क्रंमाकावर असुन दुसऱ्या क्रंमाकावर चीन देश आहे. लोकसंख्या वाढ चिंतेचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, गरिबी, अन्न धान्य तुटवडा, निरक्षरता, गर्दी, प्रदुषण, रुग्णालयात रुग्ण वाढ, शिक्षणाचा अभाव, वाढते शहरीकरणामुळे झाडे कमी परिणामी पाऊस कमी त्यामुळे कोरडा दुष्काळाची वेळ निर्माण होते. नैतिकता व सामाजिकस्तर पातळी खाली जावुन गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये वाढ होते इत्यादी हे केवळ लोकसंख्या वाढीमुळे होत असेल तर यामध्ये चांगल्या दृष्टीकोनातुन या मध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे. म्हणुनचं म्हणतात 'लहान कुंटुंब सुखी कुंटुंब.'

लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी विविध उपाय योजना, उपक्रम राबविण्यांत येत आहे. त्यापैकी एक म्हणजे राष्ट्रीय कुंटुंब कल्याण कार्यक्रम होय. शासकिय रुग्णालयातुन कुंटुंब नियोजनाची माहिती व उपक्रम बाबत सांगितले जाते. कुंटुंब कल्याण कार्यक्रमात दोन प्रकारच्या पध्दती आहेत एक कायमची नसबंदी शस्त्रक्रिया व दुसरा प्रकार तात्पुरती कुंटूंब नियोजन पध्दत. यामध्ये स्त्री, पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली जाते व तात्पुरती पध्दतीमध्ये गर्भनिरोधक गोळया, अंतरा इंजेक्शन, कॉपर–टी, निरोध इ. बाबत जनतेत: जागरुकता निर्माण केली जाते. ज्यामुळे लोकसंख्या नियंत्रण वाढीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी लहान कुंटुंबाचे फायदे बाबत जनजागृती, बालविवाह कायदयाची अंमलबजावणी, राष्ट्रीय कुंटूंब कल्याण कार्यक्रमाची माहिती, प्रत्येक कुंटुंबाने परिवार नियोजनाचा सल्ला घेऊन अंमलबजावणी करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असले पाहिजे.

आवाहन : लहान कुंटूंब सुखी कुटुंब.

**- (डॉ. जयश्री भुसारे) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, जालना.**

## हायपर पॅरेंटिंग म्हणजे काय ? काय होतो मुलांवर परिणाम...

हायपर पॅरेंटिंग ही पालकत्वाची एक पद्धत आहे. ज्यामध्ये पालक मुलांना त्यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात. भलेही ते त्यांच्या चांगल्यासाठी असे करत असतील, परंतु पालकांची अशी वृत्ती आणि वातावरण मुलांसाठी खूप वाईट असू शकते. हायपर पॅरेंटिंगमुळे मुले हळूहळू रागीट, चिडचिडे आणि हिंसक बनतात.



हायपर पॅरेंटिंगचे तोटे :

टेन्शन : हायपर पॅरेंटिंगमुळे मुलांमध्ये तणाव, नैराश्याची समस्या वाढू शकते. आपली मुले हुशार व्हावीत म्हणून पालक त्यांच्यावर अभ्यास करण्यासाठी आणि वेगवेगळ्या ॲक्टीव्हीटीमध्ये सहभागी होण्यासाठी दबाव आणतात. यामुळे अनेकवेळा मुलांना अनेक गोष्टी इच्छा नसताना कराव्या लागतात. त्यामुळे मुले तणावात राहतात.

घाबरत राहा : हायपर पॅरेंटिंगमध्ये पालक मुलाला पूर्ण नियंत्रणात ठेवतात. त्यामुळे मुले त्यांच्या पालकांशी कोणत्याही चांगल्या–वाईट गोष्टी शेअर करू शकत नाहीत. मुलांना लोकांच्या गर्दीची भीती वाटते, एकटे राहणे पसंत करतात. एकाकीपणाशी झुंजणाऱ्या मुलालाही प्रत्येक काम करताना अडचणींचा सामना करावा लागतो.

पालक शत्रूसारखे वाटायला लागतात : मुले अशा पालकांना आपले शत्रू मानतात. त्यांना असे वाटते की ते सतत त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत. जेव्हा मुलांना हवं ते करता येत नाही आणि त्याचे कारण पालक असतात, तेव्हा ही चिडचिड त्यांना त्यांच्या पालकांपासून दूर करू लागते.

स्वत:ला कमी लेखणे : पालक मुलांकडून अनेक प्रकारच्या अपेक्षा ठेवतात आणि जेव्हा मुलं त्या पूर्ण करू शकत नाहीत, तेव्हा सुखी असूनही ते स्वत:ला कमी समजू लागतात. त्याची झलक त्याच्या वागण्यातून दिसून येते. काही वेळा हायपर पॅरेंटिंगला बळी पडलेल्या मुलांचे वर्तन घातक ठरू शकते.

## त्यांच्या वाणीतून....

भारताला 'मेरीटाईम पॉवर' बनविणारे वाढवण बंदर जसे देशातील सर्वोत्तम 'ऑफ शोअर पोर्ट' होणार आहे त्याचप्रमाणे सर्वोत्तम 'ऑफ शोअर एअरपोर्ट' मुंबईत उभारणार असून जे मुंबईतील तिसरे एअरपोर्ट असेल. याचे काम लवकरच सुरू होईल. राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये विमानतळ आणि धावपट्टीची सुविधा आहे आगामी कालावधीत ३० जिल्ह्यामध्ये या सुविधा वाढवत आहे.

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गरिबांच्या जागा धाकदपट करून, जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून हडप केल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. संपूर्ण राज्यात अशा जागांची तपासणी करून गरिबांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल.

– महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

# आषाढी पौर्णिमेचं ऐतिहासिक महत्व

पौर्णिमा म्हणजे प्रत्येक महिण्याच्या मध्यावर असणारा पंधरावा दिवस होय. या दिवशी सुर्य व चंद्र यांच्या प्रकाशचा लाभ सतत २४ तास पृथ्वीवरील सजीव प्राणीमात्रांना मिळतो. सूर्याचा प्रखर व स्वच्छ प्रकाश, चंद्राचा शीतल व आल्हाददायक प्रकाश यामुळे या दिवशी पृथ्वीवर एक प्रकारचे उत्साही, आनंदी व उत्तेजनशील वातावरण पसरलेले असते निसर्गाच्या सनिघ्यात अशा पौर्णिमेच्या दिवशी जीवन कसे उबदार व शक्तिवर्धक वाटते.

आषाढी पौर्णिमेच्या पवित्र दिवसाला गर्भमंगळ दिन, महाभिनिष्क्रमण दिन, धम्मचक्र प्रवर्तन दिन व वर्षावास प्रारंभ दिन अशा अर्थपूर्ण विविध नावानी संबोधिले जाते. या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी तथागत गौतम बुध्दाच्या जीवनकालक्रमात फार मोठया संस्मर्णीय घटना घडल्या आहेत. आषाढी एकादशीला बुध्दांनी धम्मचक्र गतिमान केले, म्हणून या दिवशी त्याकाळी लोक विहारात जाऊन प्रवचनाचा लाभ घेत होते. त्या प्रथेचे स्वरुप बदलले असते तरी आजही लोक आषाढी पौर्णिमेला वाऱ्या काढतांना दिसत आहेत. या वाऱ्यांचे आणि पालख्या निघत असल्याचे बीज धम्मचक्र प्रवर्तन दिनातून निघाले आहे.कपिलवस्तूची महाराणी महामाया मातेच्या उदरी गर्भधारणा झाल्याची जाणीव निश्चीत झाली म्हणून या पौर्णिमेच्या दिवसाला गर्भमंगळ संबोधिल्या जाते. त्यानंतर बरोबर एकोणतीस वर्षानी राजपुत्र गौतम यांनी आपल्या सुखमय वैभवाचा, स्वत:च्या पत्नीपुत्राचा, माता–पित्याचा, धनसंपत्तीचा केवळ जगातील मानवाच्या दु:खमुक्तीचा मार्ग शोधण्यासाठी, सत्याचे संशोधन करण्याच्या उद्देशाने प्रभावित होऊन या आषाढी पौर्णिमेच्या दिवशी गृहत्याग केला. म्हणून या पौर्णिमेला 'महाभिनिष्क्रमण दिन' असे संबोधिले जाते. गृहत्याग केल्यानंतर अथक परिश्रमाने स्वदेहास क्लेश देऊन सतत सहा वर्षाच्या घोर तपश्चर्येनंतर बोधीसत्व सिध्दार्थास बुध्दत्व प्राप्त झाले ते प्रज्ञावंत महामानव झाले.

सम्यक संबोधी प्राप्त झाल्यानंतर ज्ञानप्राप्तीच्या आनंदाचा अनुभव घेत घेत त्यांनी सतत तब्बल सात आठवडे पायी प्रवास केला. प्रवास करीत असतांनाच या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी सारनाथ येथे पंचवर्गीय ब्राम्हण भिक्खूंना (कौडिण्य, अश्वजित, महानाम, कश्यप, भद्रीक) त्यांनी आपण स्वत: अनुभवलेल्या सत्यशोधनाचा उपदेश कथन केला. त्यांनी कथन केलेल्या सत्यशोधन ऐकूण हे पाचही ब्राम्हण भिक्षू प्रभावित झाले. ती या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी करिता या पौर्णिमेस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' असे संबोधिले जाते. याचप्रमाणे या आषाढ पौर्णिमेचे दुसरे एक महत्व मानले जाते, ते म्हणजे पंचवर्गीय भिक्खूसंघासोबत तथागत गौतम बुध्दांनी सारनाथ येथील ऋषिपतन हरणाच्या बागेत वर्षावास प्रारंभ केला म्हणून या पौर्णिमेस 'वर्षावास प्रारंभ दिन' म्हणूनही संबोधण्यात येते. बुध्दांनी आपल्या 'एकसष्ठ भिक्षूंचा संघ' आषाढी पौर्णिमेला स्थापन केला. जगातील सर्वात पहिल्या भिक्खू संघाची स्थापना ज्या दिवशी झाली तो दिवस आषाढी पौर्णिमा होता.

वर्षावास म्हणजे नेमके काय? याचे स्पष्टीकरण करावयाचे झाल्यास वर्षावास म्हणजे आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यतच्या कालावधीस वर्षावास म्हणतात. या वर्षावासाच्या कालावधीत भिक्खूगण सामुदायिकरित्या ठरविलेल्या एकाच ठिकाणी वास्तव्य करतात. ही परंपरा तथागतांनीच सुरु केलेली आहे. त्यांनी ४५ वर्षावास भिक्खूसंघा समवेत वास्तव्य केलेले आहे आणि तीच परंपरा आजतागायत अखंडपणे प्रत्येक विहारात सुरु असते, आहे. ज्याठिकाणी त्यांचे वास्तव्य असते. त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या परिसरातील बौध्द उपासक–उपासिकांना भगवान बुध्दाच्या पवित्र धम्माच्या शिकवणूकीचा उपदेश आपल्या धम्मप्रवचनातून करतात. धम्म आचरणात कसा आणावं, धम्म शिकवणूकीचे काटेकोरपणे पालन आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये कसे अमलात आवावे की जेणेकरुन माणसाचे अज्ञान, अविज्ञा नाहीसे होऊन तो माणूस सुज्ञ सुसंस्कृत होईल. या वर्षावासाच्या कालावधीत ते बुध्द–धम्म–संघ या त्रिरत्नांची उद्बबोधक माहिती सांगितली जाते. त्याचप्रमाणे उपासक–उपासिकांना बुध्द पूजा–वंदना–सुत्तपठण याचे आपला जीवनाशी निगडित असलेले महत्व हे देखील आपला धम्मप्रवचनाद्वारे भिक्षू कथन करतात. त्यामुळ उपासक–उपासिकांची आत्मशुध्दी होते कारण उपसाही केला जातो.

वर्षावासाचा कालावधी संपल्यानंतर श्रध्दाभावनेने, निष्ठेने सामुदायिकरित्या हा महोत्सव साजरा केला जातो. अशा तऱ्हेने या वर्षावास सोहळयाचा समारोप केला जातो. त्यानंतर एकत्रित वास्तव्य करीत असलेले सर्व भिक्खूगण धम्म प्रचारार्थ–प्रसारार्थ वेगवेगळया दिशेने वेगवेगळया ठिकाणी जातात. अशा प्रकारे आषाढ पौर्णिमेचे जगात अनन्यसाधारण महत्व आहे.

उपासक–उपासिकांमध्ये बंधुत्वाची, समतेची, मैत्रीची, करुणेची भावना निर्माण व्हावी हीच वर्षावासानिमीत्त मंगलकामना, शुभेच्छा !

**प्रभाकर सोमकुवर**
**भ्रमणध्वनी : ९५९५२५५९५२**

# सत्यशोधक कामगार संघटनेचा चांदुर बिस्वा येथे भव्य कामगार मेळावा संपन्न!

विशेष प्रतिनिधी नांदुरा:– सत्यशोधक कामगार संघटनेचा भव्य मेळावा दिनांक १०/७/२०२५ रोजी चांदुर बिस्वा येथे संपन्न झाला. यावेळी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सुभाष काशीराम तायडे हे होते,तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सत्यशोधक कामगार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर तायडे, मुख्य अतिथी भाई बाबुराव सरदार राज्य प्रवक्ते भूमी मुक्ती मोर्चा महाराष्ट्र, नितीन वाकोडे राज्य संघटक बिल्डिंग पेंटर बांधकाम व इतर असंघटित मजूर संघ हे होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज,क्रांतीबा ज्योतीबा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले,यावेळी मान्यवरांनी मेळाव्याला संबोधित केले. सत्यशोधक कामगार चळवळ जी महात्मा ज्योतीराव फुल्यांची चळवळ म्हणून ओळखली जाते.भारतीय कामगार चळवळीचे प्रणेते जनक रावबाहदूर नारायण मेघाजी लोखंडे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्वतंत्र मजदूर युनियन आहे. हा कामगार मेळावा कामगारांच्या उत्थानासाठी असुन सर्व कामगारांनी जात,धर्म,पंथ, राज्य सोडून आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकत्र येवून भांडवलशाहीच्या विरोधात लढा तिव्र करणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन कामगार नेते तथा प्रसिद्ध साहित्यिक, पत्रकार,स्तंभ लेखक,असंघटित कामगार चळवळीचे प्रणेते राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय सागरजी तायडे मुंबई,यांनी केले ते या मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संबोधतीत करत होते.

असंघटित कष्टकरी कामगारांच्या न्याय, हक्क व प्रतिष्ठेसाठी लढणारी सत्यशोधक कामगार संघटना ही १९८२ साली स्थापन करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिष्य रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधकाच्या नेतृत्वाखाली मिलमध्ये काम करणाऱ्या असंघटित कष्टकरी कामगारांची देशातील पहिली




कामगार संघटना बांधून पहिला देशव्यापी संप घडवून आणला.अशा क्रांतिकारी विचारांच्या कामगार चळवळीच्या नेत्याची महान परंपरा सत्यशोधक कामगार संघटनेला लाभली आहे. त्यात असंघटित शेतकरी,शेतमजूर,बिगारी मजूर,बिल्डिंग कामगार मजुर,असंघटित मंजूर या मेळाव्या निमित्याने सहभागी होत आहात आणि एक महान वैचारिक नाते जोडत आहात त्याबद्दल सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

या प्रसंगी सत्यशोधक चळवळीत महाराष्ट्र राज्याचे महासचिव म्हणुन भाई बाबुराव सरदार यांची नियुक्ती करण्यात आली.राज्यस्तरावर कामगारांसाठी न्याय मागण्या साठी शेतमजूर आणि वेठीबिगारी कामगार यांना न्याय व हक्क देण्यासाठी असलेली रजिस्टर संघटनेचा राज्यस्तरीय महासचिव म्हणुन नियुक्ती देतांना राष्ट्रीय अध्यक्ष आयु. सागर तायडे यांनी संविधान आणि त्यातील कामगारांसाठी असलेले कायदे भाई सरदार यांना पुरेपूर ज्ञात असल्याने एक अभ्यासु आणि लढाऊ धाडसी नेता चळवळीला मिळाल्याने राज्यात प्रशासकिय अधिकाऱ्यांशी सनदशिर मार्गाने चर्चा करून कामगार मजुरांना न्याय मिळवून देण्यास सोपे जाईल.अशा प्रकारची भावना सागर तायडे यांनी आपल्या मार्गदर्शनीय भाषणात व्यक्त केली.भाई बाबुराव सरदार यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी भाई सरदार यांचे अत्यंत अभ्यासपूर्ण संविधानिक कामगार चळवळीवर भाषण झाले. चांदुर बिस्वा येथील माजी सरपंच तथा युवा नेते सुभाष तायडे याप्रसंगी त्यांच्याकडे बुलढाणा जिल्हाध्यक्ष पद,तथा दिनेश ब्राम्हणे (पत्रकार) यांना नांदुरा तालुकाध्यक्ष पद देण्यात आले.यावेळी अनेक कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या सागर तायडे साहेबांनी केल्या.मंचावर,नितीन वाकोडे,बिल्डिंग पेंटर बांधकाम व इतर असंघटित मजूर संघाचे राज्य संघटक होते.यावेळी नितीन वाकोडे याचेही समायोचित भाषण झाले.दिनेश ब्राम्हणे यांनी उत्कृष्ट सूत्र संचलन केले. तर आभार प्रदर्शन,सेवानिवृत आर पी एफ अधिकारी मा.काशीराम तायडे यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी महेन्द्र वानखेडे,जयकांत पवार,मुकींदा वाकोडे, विजयानंद तायडे,शेख मतीन,रमण पडोळकर,गजानन पडोळकर,सुरेश वाढे,सुरेश गोळे,रवि इंगळे आदिनी मोलाचे सहकार्य केले.असंघटित शेतकरी,शेतमजूर,बिगारी मजूर,बिल्डिंग कामगार मजुर,या मेळाव्या बहुसंख्येने उपस्थित होते.

**दिनेश ब्राम्हणे पत्रकार**
**९०४९२१३९८३,नांदूरा यांस कडून**

## मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांची मोहनराव पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ला सदिच्छा भेट

शिरूर ताजबंद – महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी शिरूर ताजबंद येथील मोहनराव पाटील कॉलेज ऑफ बीएससी नर्सिंग व चॅरिटेबल हॉस्पिटल ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व प्रशासनाला विविध सूचना करून त्या सूचना अंमलबजावणीत आणण्याचे निर्देश दिले.



सविस्तरवृत्त असे की, शिरूर ताजबंद येथील बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाच्या मोहनराव पाटील कॉलेज ऑफ बीएससी नर्सिंग व चॅरिटेबल हॉस्पिटल या ठिकाणी ना. पाटील भेट देऊन विविध विभागाची पाहणी केली. या शैक्षणिक वर्षापासून बीएससी नर्सिंग हा कोर्स या महाविद्यालयात सुरू होत असून त्यासाठी अहमदपूर आणि चाकूर विधानसभा मतदारसंघातील पात्र विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रवेश घ्यावा असेही आवाहन त्यांनी केले. व मतदारसंघाच्या सोयीसाठी चॅरिटेबल हॉस्पिटल व नर्सिंग कॉलेज ची निर्मिती करण्यात आली असून याचा लाभ सुद्धा मतदारसंघातील जनतेने घ्यावा असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी संचालक साहेबराव जाधव, प्राचार्य डॉ दत्ता पाटील, डॉ एन एस पाटील, यादव करडीले, प्रा. दीपक भराटे, कैलास क्षिरसागर सह आदी उपस्थित होते.

## राशिभविष्य १३ ते १९ जुलै २०२५

मेष : तुम्ही आपल्या मतांबद्दल अधिक ठाम राहणार आहात. तुमच्या व्यक्तीमत्वाचा इतरांवर प्रभाव राहील. नोकरीमध्ये तुमच्या शब्दाला मान मिळेल. मान–सन्मानाचे योग येतील. प्रतिष्ठा मिळेल. अनेक दिवस प्रॉपर्टीची, व्यवसायाच्या जागेची, रखडलेली कामे आगामी काळात नक्कीच पूर्ण करू शकाल. तुमच्या कार्यक्षेत्रात एखादी सुसंधी मिळेल.

वृषभ : आगामी काळात आपल्या जिद्द व चिकाटीमध्ये वाढ होणार आहे. आपला आत्म विश्वास अधिक दृढ होणार आहे. आजपासून तुम्हाला तुमच्या हितशत्रूंची, विरोधकांची तसेच व्यवसायातील सहस्पर्धकांची त्यांच्या कारवायांची काळजी करावयास नको. त्यांचे बेत तुम्ही उधळून लावू शकाल. आज आपण आपल्या आर्थिक कामांना प्राधान्य द्यावे, ती पूर्ण होतील. कौटुंबिक सौख्य लाभेल.

मिथुन : आज आपण उतसाहाने व आनंदाने कामे कराल. तुम्ही अधिक आशावादी राहाल. तुम्ही अधिकाधिक कामे पूर्ण करण्याकडे लक्ष द्याल. तुमचा इतरांवर प्रभाव राहील. आगामी काळात प्रकृतीच्या काही समस्या उभ्या राहण्याची शक्यता आहे. हितशत्रूंचा त्रास जाणवेल.

कर्क : जिद्द व मनोबल वाढेल. आत्मविश्वासाने कार्यरत राहल. तुमच्या कार्यक्षेत्रात एखादी सुसंधी लाभेल. भाग्यकारक घटना घडेल. आगामी काळात तुमच्या प्रॉपर्टीसंदर्भातील समस्या कमी होणार आहेत. आगामी काळ हा बिल्डर्स, इस्टेट एजंटस् बांधकाम व्यावसायिक यांना विशेष लाभाचा ठरणार आहे. तुमचे वास्तूबद्दलचे स्वप्न साकार होण्याची चिन्हे दिसतील.

सिंह : आजचा दिवस तसा सामान्यच म्हणावा लागेल. प्रवास आज नकोत. महत्वाची कामे, महत्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. अकारण एखादा खर्च झाल्याने मानसिक सौख्य नाहीसे होईल. घरात मतभेदाची शक्यता आहे. आगामी काळात तुम्ही अधिक आत्मविश्वासाने वागाल, तुम्ही आपल्या मतांबद्दल अधिक आग्रही राहल, कठोरपणा मात्र टाळावयास हवा.

कन्या : आज आपण आपली अडलेली रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. नव्या उत्साहाने व नव्या उमेदीने कामाला लागाल. आनंदी व आशावादी रहाल. वैवाहिक जोडीदाराची योग्य ती साथ लाभल्याने सुखावून जाल. व्यवसायात उलाढाल वाढवू शकाल. आगामी काळात आपणाला अकारण होणाऱ्या खर्चाला आळा घालावा लागेल.

तूळ : पैसे मिळणे या दृष्टीने दिवस चांगलाच आहे. काहींना अचानक धनलाभ संभवतो. संततीचे प्रश्न सोडवू शकाल. प्रियजनांचा सहवास लाभेल. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायामध्ये काही अडचणी येऊ शकतात, तसेच संततीसंदर्भात एखादा मनस्ताप संभवतो. आगामी काळात आपले काही निर्णय चुकण्याची शक्यता आहे वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. विरोधकांची मात्र काळजी नको.

वृश्चिक : प्रवासाचे योग आज येणार आहेत व ते सुखकर होतील. नातेवाईकांचे अपेक्षित सहकार्य लाभेल. एखाद्या अवघड कामात मित्रांची मदत होईल. तुमच्या कामाच्या ठिकाणी तुम्हाला हवी असलेली संधी मिळेल. तुमच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव पडेल. तुम्ही तुमच्या मतांबद्दल आग्रही राहणार आहात. आरोग्याच्या तक्रारी जाणवू शकतात. तुमच्या स्वभावात कडकपणा येईल.

धनु : आजही दिवसभर तुमचा काम करण्याचा मूड असणार नाही. कामे टाळण्याकडे प्रवृत्ती राहील. निरुत्साह जाणवेल. नोकरीमध्ये वरिष्ठांशी मतभेद होण्याची शक्यता आहे. निरुत्साही वातावरण जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावे. इतके दिवस रखडलेले आर्थिक व्यवहार आगामी काळात पूर्ण होणार आहेत.

मकर : आपले व्यक्तीमत्व अधिक प्रभावी बनेल. आत्मविश्वास, जिद्द चिकाटी वाढेल. कामाची जबाबदारी स्वीकाराला. वैवाहिक जीवनात मात्र आगामी काळात तीव्र मतभेद संभवतात. त्यामुळे संयमाचे धोरण स्वीकारावयास हवे. आज आपण एखाद्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हाल. आरोयाची तक्रार जाणवेल. खर्च वाढणार आहेत.

कुंभ : मन प्रसन्न व आनंदी राहील. आरोग्य उत्तम लाभेल. व्यवसायात सुास्थिती राहील. नोकरीत तुमच्या शब्दाला मान दिला जाईल. प्रतिष्ठा लाभेल. सार्वजनिक कार्यात सुयश लाभेल. प्रवास सुखकर होतील. व्यवसायातील तुमचे निर्णय आगामी काळात अचूक ठरणार आहेत. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. संततीच्या संदर्भात मात्र एखादा मानसिक त्रास संभवतो.

मीन : तुमच्या विचारांना आज योग्य दिशा मिळेल. बौद्धिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दिवस विशेष चांगला जाणार आहे. व्यवसायात आर्थिक लाभ होतील. काहींना अचानक धनलाभ संभवतो. मित्रांचे सहकार्य लाभेल. विरोधकांचा व हितशत्रूंचा त्रास कमी होणार आहे. प्रॉपर्टीसंदर्भात मात्र एखादी समस्या उभी राहू शकते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894